THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 25TH MAY 1893.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ९ माहे मार्च सन १८९३ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—**

### सन १८९३ चा आक्ट ४ था.

**वांटप करण्यासंबंधी कायदा सुधारण्यासाठीं आक्ट.**

ज्या अर्थी वांटप करण्यासंबंधी कायदा सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी या आक्टावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) या आक्टास सन १८९३ चा वांटप करण्यासंबंधी आक्ट असें ह्मणावें.

सरनामा, व्याप्ति, सुरुवात, व कायम ठेवणें.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्तानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल असें समजावें.

(४) परंतु ज्या स्थावर मिळतीच्या संबंधानें सरकारास सारा देण्यांत येत असेल त्या स्थावर मिळकतीचें वांटप करण्याच्या संबंधानें ज्या कोणत्याहि स्थानिक कायद्यांत ठराव असतील त्या कायद्यास या आक्टांतील कोणत्याहि ठरावावरून व्यत्यय येतो असें समजूं नये,

२. कोणताहि वांटप करण्याविषयींचा दावा या आक्टाच्या सुरुवातीपूर्वी केला असता तर त्या दाव्यांत वांटप करण्याविषयीं हुकुमनामा झाला असता अशा दाव्यांत जेव्हां कोर्टास असें दिसून येईल कीं तो दावा ज्या मिळकतीसंबंधी असेल त्या मिळकतीच्या प्रकाराच्या कारणानें किंवा त्या मिळकतींतील हिसेदारांच्या संख्येच्या कारणानें किंवा इतर कोणत्याहि विशेष गोष्टीच्या कारणानें त्या मिळकतीचा विभाग वाजवी अगर सोईवार रीतीनें करतां येत नाहीं, व ती मिळकत विकून होईल तें उत्पन्न वांटून दिल्यास सर्व हिसेदारांचा ज्यास्त फायदा होईल, तेव्हां त्या मिळकतीच्या निमे अगर त्याहून अधिक भागांत ज्याचा एकट्याचा किंवा ज्यांचा एकत्र

वांटप करण्याविषयींच्या दाव्यांमध्यें विभाग करण्याच्या ऐवजीं विक्री करण्याविषयीं हुकुम करण्याचा कोर्टास अधिकार.

हितसंबंध असेल अशा कोणत्याहि त्या मिळकतींतील हिसेदारानें किंवा हिसेदारांनीं दरखास्त केली असतां, ती मिळकत विकून होईल तें उत्पन्न वांटून देणें कोर्टास योग्य वाटल्यास त्याप्रमाणें करण्यास कोर्ट मुखत्यार आहे.

हिसेदार विकत घेण्याचें पतकरील त्या प्रसंगीं काम चालविण्याची रीति.

३. (१) विक्री करण्याविषयीं फर्माविण्यासाठीं कोर्टास सदरील शेवटल्या कलमाअन्वयें दरखास्त केली असेल अशा कोणत्याहि प्रसंगीं इतर कोणताहि हिसेदार विक्री करावयास सांगणाऱ्या पक्षकाराचा हिसा किंवा पक्षकारांचे हिसे ठरेल त्या किंमतीस विकत घेण्याची परवानगी मिळण्यासाठीं अर्जी करील तर, कोर्टानें आपणास योग्य वाटेल त्या रीतीनें त्या हिशाची अगर हिशांची किंमत ठरविण्याविषयीं हुकुम केला पाहिजे आणि याप्रमाणें ठरविण्यांत आलेल्या किंमतीस तो हिसा अगर ते हिसे अशा हिसेदारास विकत देऊं काढले पाहिजेत, आणि त्या बाबतींत जरूर व योग्य असतील ते सर्व हुकुम देण्यास कोर्ट मुखत्यार आहे.

(२) दोन किंवा अधिक हिसेदार पोट-कलम (१) यांत ठरविल्याप्रमाणें विकत घेण्याची परवानगी मिळण्यासाठीं निरनिराळ्या अर्ज्या करतील तर, कोर्टानें ठरविलेल्या किंमतीहून अधिक अशी सर्वांत मोठी किंमत देऊं काढणाऱ्या हिसेदारास तो हिसा अगर ते हिसे विकण्याविषयीं कोर्टानें हुकुम केला पाहिजे.

(३) जर असा कोणताहि हिसेदार असा हिसा किंवा असे हिसे सदर्हूप्रमाणें ठरविलेल्या किंमतीस विकत घेण्यास खुषी नसेल तर, ज्यानें किंवा ज्यांनीं अर्जी केली असेल तो किंवा ते अशा अर्जीचा किंवा अर्ज्यांचा, अगर अशा अर्जीच्या किंवा अर्ज्यांच्या संबंधानें झालेला, सर्व खर्च देण्यास पात्र असतील असें समजावें.

नांदत्या घरांतील हिसा ज्या इसमाच्या नांवावर करून दिला असेल त्यानें वांटप करण्याविषयीं दावा करणें.

४. (१) अविभक्त कुटुंबाच्या नांदत्या घराचा हिसा त्या कुटुंबांतील असामी नाहीं अशा मनुष्याच्या नांवावर करून दिला असून तो मनुष्य वांटप करण्याविषयीं दावा करील तेव्हां, त्या कुटुंबांतील कोणताहि असामी एक, हिसेदार असून त्या मनुष्यांचा हिसा विकत घेण्याचें पतकरील तर, कोर्टानें आपणास योग्य वाटेल त्या रीतीनें त्या हिशाची किंमत ठरविली पाहिजे व तो हिसा अशा हिसेदारास विकण्याविषयीं फर्माविलें पाहिजे; आणि त्या संबंधानें जरूर व योग्य असतील ते सर्व हुकुम करण्यास कोर्ट मुखत्यार आहे.

(२) पोट-कलम (१) यांत सांगितल्या प्रकारच्या कोणत्याहि प्रसंगीं कुटुंबांतील दोन किंवा अधिक असामी असे हिसेदार असून पृथक् पृथक् विकत घेण्याचें पतकरतील तर, कोर्टानें सदरील शेवटल्या कलमाचें पोट-कलम (२) यांत ठरविलेल्या रीतीनें काम चालविलें पाहिजे.

असमर्थ असलेल्या पक्षकाराच्या वतीनें काम चालविणें.

५. वांटप करण्याविषयींच्या कोणत्याहि दाव्यांतील कोणत्याहि असमर्थ असलेल्या पक्षकाराच्या वतीनें काम चालविण्याचा अधिकार मिळालेल्या कोणत्याहि मनुष्यास अशा दाव्यांत त्या पक्षकाराच्या वतीनें विकण्याविषयीं दरखास्त करण्याचा, किंवा विकत घेण्याची कबुलायत देण्याचा किंवा विकत घेण्याची परवानगी मिळण्यासाठीं अर्जी करण्याचा अधिकार आहे; मात्र याप्रमाणें विकल्याच्या किंवा विकत घेतल्याच्या योगानें सदर्हू असमर्थ असलेल्या पक्षकाराचा फायदा होईल असें कोर्टास वाटल्याशिवाय अशी कोणतीहि दरखास्त, कबुलायत किंवा अर्जी मंजूर करणें कोर्टास भाग आहे असें समजूं नये.

सरकारी सवाल व हिसेदारांचा सवाल.

६. (१) २ऱ्या कलमाअन्वयेंची प्रत्येक विक्री सरकारी सवालास पात्र असली पाहिजे व अशा सवालाची रकम कोर्टानें आपणास योग्य वाटेल त्या रीतीनें ठरविली पाहिजे, आणि त्या रकमेंत वेळोवेळीं फेरफार करण्याचा अधिकार आहे.

(२) अशी कोणतीहि विक्री झाली असतां, हिसेदारांतून कोणत्याहि हिसेदारास त्या विक्रीच्या वेळीं, अमानत रकम न ठेवण्याबाबद किंवा विक्रीचा पैसा किंवा त्याचा कोणताहि भाग रोख न देतां त्याची वजावाट करण्याबाबद किंवा त्याचा हिशोब

देण्याबाबद ज्या शर्ती ठरविणें कोर्टास योग्य वाटेल त्या शर्तींवर विकत मागण्याची मोकळीक आहे असें समजावें.

(३) अशा विक्रीच्या वेळीं विकत मागतांना दोन किंवा अधिक मनुष्य एकच रकम बोलतील व त्या दोन किंवा अधिक मनुष्यांपैकीं एक मनुष्य त्या मिळकतींतील हिसेदार असेल तर सदहू मागणें त्या हिसेदाराचें आहे असें समजलें पाहिजे.

विक्रीच्या प्रसंगीं काम चालविण्याची रीति.

७. या आक्टांत वर ठराविलें आहे त्या खेरीज इतर प्रसंगीं कोणतीहि मिळकत या आक्टाअन्वयें विकण्याविषयीं फर्माविलें असेल तेव्हां, शक्य असेल तेथवर, खालीं सांगितलेल्या रीतीनें काम चालविलें पाहिजे, ह्मणजे :—

(अ) ती मिळकत कलकत्ता, मद्रास किंवा मुंबई येथील है कोर्टानें आपली अवल हुकुमत चालवून केलेल्या किंवा रंगून येथील रेकार्डरच्या कोर्टानें केलेल्या हुकुमनाम्याअन्वयें किंवा हुकुमाअन्वयें विकली जाईल तर, रेजिस्ट्राराकडून मिळकत विकली जाण्याबाबद अशा कोर्टाची आपल्या अवल दिवाणी अधिकारांत जी रीति असेल त्या रीतीनें काम चालविलें पाहिजे;

(ब) ती मिळकत इतर कोणत्याहि कोर्टाच्या हुकुमनाम्याअन्वयें किंवा हुकुमाअन्वयें विकली जाईल तर, या बाबतींत है कोर्ट वेळोवेळीं कानू करून जो रीति ठरवील त्या रीतीनें काम चालविलें पाहिजे, व अशा कानू केल्या जात तोंपर्यंत, हुकुमनाम्यांची बजावणी करतांना करावयाच्या विक्रीच्या संबंधानें सिव्हिल प्रोसीजर कोडांत ठरविलेल्या काम चालविण्याच्या रीतीप्रमाणें काम चालविलें पाहिजे.

विक्री करण्याबाबदचे हुकुम हे हुकुमनामे आहेत असें मानणें.

८. २ऱ्या, ३ऱ्या किंवा ४थ्या कलमाअन्वयें कोर्टानें जो कोणतीहि विक्री करण्याबाबद हुकुम केला असेल तो, सिव्हिल प्रोसीजर कोडाच्या २ऱ्या कलमाच्या अर्थाप्रमाणें हुकुमनामा आहे असें समजावें

कांहीं अंशीं वांटप व कांहीं अंशीं विक्री करण्याविषयीं हुकुम करण्याचा अधिकार कायम ठेवणें.

९. वांटप करण्याविषयींच्या कोणत्याहि दाव्यांत कोर्टास योग्य वाटल्यास कोर्ट, ज्या मिळकतीसंबंधी दावा असेल त्या मिळकतीच्या कांहीं भागाचें वांटप करण्याबाबद व बाकी भागाची विक्री करण्याबाबद या आक्टाअन्वयें हुकुमनामा करण्यास मुखत्यार आहे.

चालू दाव्यांस आक्ट लागू होणें.

१०. या आक्टाच्या सुरुवातीच्या पूर्वीं मांडलेल्या ज्या दाव्यांमध्यें मिळकतीचें वांटप करण्याबाबदची कोणतीहि योजना कोर्टानें अखेर पसंत केली नसेल त्या दाव्यांस हा आक्ट लागू आहे असें समजावें.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.